**महाराष्ट्र शासन**
उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, नंदुरबार

टोकर तलाव रोड, जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, नंदुरबार
ईमेल dmmundb@gmail.com फोन नं ०२५६४ - २१०६७०

# जाहिरात

## कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेस्तव पुरवठादार निवडी (Vendor Identification) करिता अर्ज आमंत्रण सूचना

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसहायाने दिनदयाळ अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलब्रजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, नंदुरबार व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष शहादा, अक्कलकुवा व धडगाव च्या संचालनाकरिता कार्यालयीन फर्निचर खरेदी करण्यास्तव Limited E-tender पध्दतीव्दारे संपादणूक प्रक्रिया करुन दरपत्रक आमंत्रित करण्यात येणार आहे. सदर संपादणूक (निविदा) प्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी इच्छुक फर्निचर निर्माता किंवा व्यवसाय करणाऱ्या पुरवठादाराकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate)
२. http://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा.
३. Shop & Establishment Act/ इतर सक्षम प्रधिकारी अंतर्गत नोंदणीकृत असावा/पुरवठादार ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात असल्यास ग्रामपंचायतीचे व्यवसायाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र असावे.
४. मुल्यवर्धीत कर (VAT) नोदणीप्रमाणपत्र
५. PAN कार्ड असावे.
६. सनदी लेखापाल (Chartered Accountant) व्दारे निर्गमित मागील तीन वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate). मागील तीन वर्षाच्या उलाढालाची सरासरी रु. १० लक्ष पेक्षा कमी नसावी.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक फर्निचर निर्माता किंवा व्यवसाय करणाऱ्या पुरवठादाराकडून त्यांच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत केलेला Login Id तसेच वर नमूद केलेल्या क्रमांक ३ ते ६ च्या कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, दुसरा मजला जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर दिनांक २१/१२/२०१६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा. सदर अर्ज ई-मेल व्दारे dmmundb@gmail.com या पत्यावर सुध्दा सादर करता येऊ शकते. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाला सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियमध्ये सहभागी होण्यासाठी फर्निचर निर्माता किंवा व्यवसाय करणाऱ्या पुरवठादाराकूडून कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही.

जिल्हा अभियान संचालक
**उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, नंदुरबार**